सुस्वागतम्

राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजना

Shri P A Deshmukh Presentation

अंशदायी निवृत्तीवेतन योजनेची व्याख्या

१. शासन निर्णय क्रमांक - सीपीडास-१००५/१०२६/एसईआर-४, दिनांक ३१ ऑक्टोंबर २००५

२. दिनांक १ नोव्हेंबर २००५ नंतर राज्य शासनाच्या सेवेमध्ये निवड झालेल्या शासकीय कर्मचाऱ्यांना अंशदायी निवृत्तीवेतन लागू करण्यात आलेली आहे.

३. भारत सरकारने केलेल्या बदलाप्रमाणे राज्य शासनाने सध्या अस्तित्वात असलेल्या निवृत्तीवेतन योजनेमध्ये बदल केलेला आहे.

अंशदायी निवृत्तीवेतन योजनेची व्याख्या

४. शासनास असे ठरविण्यास आनंद होत आहे की खालील तरतुदी

i. सध्या अस्तित्वात असणारी निवृत्तीवेतन योजना (उदा. महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ आणि महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतनाचे अंशराशीकरण) नियम १९८४ आणि

ii. सध्या अस्तित्वात असणारे सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना (जी पी एफ) हे नियम दिनांक १ नोव्हेंबर २००५ रोजी किंवा त्यानंतर राज्य शासनाच्या सेवेमध्ये निवड झालेल्या शासकीय कर्मचाऱ्यांना लागू असणार नाहीत.

नवीन निवृत्तीवेतन योजनेचे प्रमुख स्वरुप

- ही योजना ही “अंशदायी निवृत्तीवेतन योजना” म्हणून ओळखली जाईल.
- सदर योजना दिनांक १ नोव्हेंबर २००५ पासून अंमलात येईल.
- दिनांक १ नोव्हेंबर २००५ रोजी किंवा त्यानंतर राज्य शासनाच्या सेवेमध्ये निवड झालेल्या सर्व शासकीय कर्मचा-यांना ही नवीन अंशदायी निवृत्तीवेतन योजना लागू असेल.

नवीन निवृत्तीवेतन योजनेचे प्रमुख स्वरुप

- नवीन अंशदायी निवृत्तीवेतन योजना सहभागावर आधारित आहे आणि सदर योजनेला दोन स्तर असतील.

  उदा. स्तर - १ आणि स्तर - २

- स्तर-१ दिनांक १ नोव्हेंबर २००५ रोजी किंवा त्यानंतर राज्य शासनाच्या सेवेमध्ये निवड झालेल्या सर्व शासकीय कर्मचाऱ्यांना लागू असून, स्तर-२ हा त्याच्यासाठी ऐच्छिक आहे आणि तो निवड करण्याचा अधिकार सदर कर्मचा-यांना आहे.

स्तर-१ आणि स्तर-२

- स्तर-१ :- प्रत्येक शासकीय कर्मचाऱ्याच्या मासिक वेतनामधून मूळ वेतन अधिक महागाई वेतन (लागू असल्यास) अधिक महागाई भत्ता यांच्या १० % रक्कम मासिक सहभाग म्हणून दरमहा कपात करण्यात येईल. राज्य शासन त्यामध्ये तेवढ्याच रकमेचा सहभाग जमा करेल. सहभाग आणि त्यामधील गुंतवणुकीपासून मिळणारे उत्पन्न हे रक्कम काढण्याची सुविधा नसणाऱ्या = निवृत्तीवेतन स्तर १ खात्यामध्ये ठेवण्यात येईल.

स्तर-१ आणि स्तर-२

- स्तर-२ :- प्रत्येक शासकीय कर्मचाऱ्यास त्याच्या निवृत्तीवेतन स्तर-१ खात्याबरोबरच स्वत:च्या इच्छेनुसार ऐच्छिक स्तर-२ रकमा काढता येणार खाते सुरु करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. शासकीय कर्मचाऱ्याचा सहभाग हा या स्वतंत्र खात्यामध्ये जमा करण्यात येईल आणि त्यामधून शासकीय कर्मचाऱ्यास त्याच्या इच्छेनुसार रक्कम काढता येतील. तथापी सदर खात्यामध्ये शासन कोणताही सहभाग जमा करणार नाही.

योजनेमधील सहभागासाठी पात्रता

- दिनांक १ नोव्हेंबर २००५ रोजी किंवा त्यानंतर राज्य शासनाच्या सेवेमध्ये निवड झालेले शासकीय कर्मचारी.
- ज्यांना सध्या अस्तित्वात असणारी निवृत्ती वेतन योजना आणि सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना लागू आहे.
- दिनांक १ नोव्हेंबर २००५ रोजी किंवा त्यानंतर जिल्हा परिषदेच्या सेवेमध्ये निवड झालेले कर्मचारी यांना लागू आहे.

अंशदायी निवृत्तीवेतन योजनेची अंमलबजावणी

- शासन निर्णय दिनांक ०७.०७.२००७
- मध्यवर्ती माहिती केंद्र प्रतिनिधी आणि निवृत्तीवेतन निधी व्यवस्थापक यांची स्थापना करण्याबाबतचे प्रकरण केंद्र शासनाच्या विचाराधीन.
- अंशराशी निवृत्तीवेतन योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी तात्पुरती व्यवस्था.
- संचालक, लेखा व कोषागारे यांचे प्रशासकीय नियंत्रणाखाली राज्य माहिती केंद्र प्रतिनिधीची स्थापना.

अंशदायी निवृत्तीवेतन योजनेची अंमलबजावणी

- राज्य माहिती केंद्र प्रतिनिधी लेखा ठेवणे व संबंधीत माहिती ठेवतील.
- सहभाग : स्तर-१ -

मूळ वेतन + महागाई वेतन + महागाई भत्ता यांच्या १०%.

- नंतर - वेतन (मूळ वेतन + ग्रेड वेतन) + महागाई भत्ता यांच्या १०%.
- पुढील आदेश प्राप्त होईपर्यंत स्तर- २ खात्याबाबतची कार्यवाही प्रलंबित ठेवावी.

राज्य माहिती केंद्र प्रतिनिधी यांचे कार्य

- नमुना - १ मध्ये कर्मचाऱ्यांची माहिती संकलन करणे.
- निवृत्तीवेतन खाते क्रमांक वाटप करणे.
- सहभागाची वसूली करणे.
- नमुना आर - ३ मध्ये माहिती एकत्रित करणे.
- व्याजाची परिगणना करणे.
- वार्षिक विवरणपत्रे तयार करणे.

राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना

- शासन निर्णय क्रमांक: अंनियो-२०१५/(एन.पी.एस.) सी.आर-३२/सेवा-४, दिनांक ०६ एप्रिल २०१५
- मूळ शासन निर्णयानुसार केंद्र शासनाच्या राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेचा राज्य शासनाने स्वीकार केला.
- अंशराशी निवृत्तीवेतन योजनेचे आता नवीन नाव “राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना” (एनपीएस) असे करण्यात आले.

करारनामे

- राज्य शासन आणि भारत सरकारने स्थापन केलेल्या राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना विश्वस्त निधी यांच्यामध्ये.
- राज्य शासन आणि नॅशनल सेक्युरिटीज डिपॉझिटरीज लिमीटेड- इ गव्हर्नन्स इनफ्रास्ट्रक्चर लिमीटेड यांच्या मध्ये (एसएसडीएल).
- भारत सरकारने एनएसडीएल यांची केंद्रीय अभिलेख देखभाल अभिकरण (सी.आर.ए.) म्हणून नेमणूक केली.

राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेचे फायदे

- कमी खर्च आणि तडजोड करण्याची शक्ती असा दुहेरी फायदा. निवृत्ती कालावधीपर्यंत निवृत्तीवेतन मालमत्ता पुर्नगुंतवणुकीच्या प्रभावाने संचय होते. आणि देखभाल खर्च हा अत्यंत कमी आहे.
- कर सवलती : आयकर कायदा १९६१, ८० सीसीडी (I) आणि ८० सीसीडी (२).

राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेचे फायदे

- सुरक्षितता : भारत सरकारकडून सुरू करण्यात आली आणि निवृत्तीवेतन निधी विनियामक व प्राधीकरण यांचे नियंत्रणाखाली सुरु.
- पारदर्शकता : निवृत्तीवेतन खात्याची स्थिती तुम्ही ऑनलाईन जाणून घेऊ शकता.
- सुलभता : सर्व भौगौलिक ठिकाणी आणि भारतामधील कोणत्याही सेवेमध्ये.

राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेमधील सहभाग रक्कमांची गुंतवणूक

- सार्वजनिक क्षेत्रामधील तीन निवृत्तीवेतन निधी व्यवस्थापकांना सहभागाची रक्कम वाटप करण्यात येते.
- एस बी आय पेन्शन फंडस प्रायव्हेट लिमीटेड – ३३%.
- यु टी आय रिटायरमेंट सोल्युशन्स लिमीटेड – ३४%.

राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेमधील सहभाग रक्कमांची गुंतवणूक

- अेल आय सी पेन्शन फंड लिमीटेड - ३३%.
- गुंतवणूक प्रमाण : शासकीय रोख्या मध्ये - ५५% पर्यंत.
- कर्ज रोख्या मध्ये - ४०% पर्यंत.
- इक्विटी मध्ये - १५% पर्यंत.
- आर्थिक बाजारा मधील दस्तऐवजामध्ये - ५% पर्यंत.

राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेचा उपयोग

- दिनांक ०१/११/२००५ रोजी किंवा त्यानंतर शासकीय सेवेमध्ये रुजू झालेल्या राज्य शासनाच्या सर्व कर्मचारी.
- अखिल भारतीय सेवेमधील अधिकारी जे भारत सरकारच्या सेवेमध्ये दिनांक ०१/०१/२००४ रोजी किंवा त्यानंतर रुजू झालेले आहेत आणि ज्यांची नेमणूक महाराष्ट्र राज्य शासनाच्या सेवेमध्ये करण्यात आलेली आहे.

राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेचा उपयोग

- दुसऱ्या कुठल्याही पद्धतीने नेमणूक झालेले कर्मचारी राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेचा फायदा मिळण्यासाठी पात्र नसतील. (उदा. करार पद्धतीवर, ठरावीक कालावधीसाठी, उपभोग कालावधीसाठी, एखाद्या प्रकल्पासाठी, किंवा इतर कोणत्याही अनियमीत पद्धतीने) कर्मचाऱ्याची नेमणूक ही विहीत पद्धतीने, योग्य त्या मार्गाने झालेली असावी.

राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेचे घटक

वर्गणीदार

निवृत्तीवेतन निधी विनियामक
व प्राधीकरण

वार्षिक सेवा पुरवठादार

नोडल अधिकारी

केंद्रीय अभिलेख देखभाल अभिकरण

रक्षक, काळजी घेणारा

विश्वस्त बँक

निवृत्ती वेतन निधी व्यवस्थापक

निवृत्तीवेतन निधी विनियामक व प्राधीकरणबाबत

- राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेवर नियंत्रण ठेवणारे अधिकारी.
- राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेचे स्वरुप ठरविणारे निर्माते.
- राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेमधील सहभागी होणाऱ्या संस्थांच्या नेमणूका करणारे.
- राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेच्या विश्वस्त निधीचे संस्थापक.
- राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेमधील सर्व मालमत्ताचे नोंदणीकृत मालक.
- सहभागी संस्थाच्या कामावर नियंत्रण आणि कामामध्ये सुधारणा/प्रगती करण्यासाठी प्रशासक.

केंद्रीय अभिलेख देखभाल अभिकरण (सी आर अे)

- निवृत्तीवेतन निधी विनियामक व प्राधीकरण यांचेकडून एन एस डी आर या संस्थेची केंद्रीय अभिलेख देखभाल अभिकरण म्हणून नेमणूक करण्यात आलेली आहे.
- केंद्रीय अभिलेख देखभाल अभिकरण हे कायम निवृत्तीवेतन लेखा क्रमांक (पी आर अे अेन) देण्यासाठी जबाबदार असतील.

केंद्रीय अभिलेख देखभाल अभिकरण (सी आर ए)

- सर्व कर्मचाऱ्याचे लेखे देण्यासाठी आणि राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजने संबंधित निवृत्तीवेतन निधी विनियामक व प्राधीकरण यांनी सोपविलेली इतर सर्व कर्तव्ये पार पाडण्यासाठी जबाबदार असतील.
- राज्य शासन आणि त्यांच्यामध्ये झालेल्या करारनाम्यानुसार सर्व तपशीलवार कर्तव्ये पार पाडतील.

नोंदणी

- राज्य नोडल अधिकाऱ्याची (एस एन ओ) नोंदणी.
- कोषागार अधिकाऱ्याची (डी टी ओ) नोंदणी.
- आहरण व संवितरण अधिकाऱ्याची (डी डी ओ) नोंदणी.
- राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेमधील कर्मचाऱ्यांची नोंदणी.

कायम निवृत्तीवेतन खाते कसे सुरु करावे?

- कोषागार अधिकारी/आहरण व संवितरण अधिकारी यांचेशी संपर्क साधा आणि कायम निवृत्तीवेतन लेखा क्रमांक मिळण्यासाठी अर्ज प्राप्त करा.

  उदा. एस - १ नमुनामधील अर्ज.

- आवश्यक असणारी माहिती भरा.
- कायम निवृत्तीवेतन लेखाखाते निर्माण करण्यात येईल आणि कायम निवृत्तीवेतन लेखाखाते कार्ड हे कोषागार अधिकारी यांना पाठविण्यात येईल.

वर्गणीदाराची नोंदणी

विभाग अ – व्यैयक्तीक तपशील (आवश्यक असणारा).

* वर्गणीदाराचे नाव
* सध्याचा पत्ता
* दूरध्वनी क्रमांक, मोबाईल क्रमांक आणि ई मेल आय डी.
* वर्गणीदाराच्या बँकेचा तपशील.

विभाग ब – व्यवसायाचा तपशील (आवश्यक असणारा).

- कायम निवृत्तीवेतन लेखा क्रमांक/एकमेव कर्मचारी ओळख क्रमांक. * जिल्हा कोषागार अधिकारी यांचा नोंदणी क्रमांक आणि आहरण व संवितरण अधिकारी यांचा नोंदणी क्रमांक.

* गिरवू नका/व्यवसायांची माहिती स्पष्ट लिहा.

वर्गणीदारांची नोंदणी

विभाग क – वारसदारांचा तपशील (ऐच्छिक).

* जास्तीत जास्त तीन व्यक्तीची वारसदार म्हणून नेमणूक करा.

* सर्व वारसदाराचे देय असणाऱ्या रक्कमेच्या भाग/ हिस्सा यांची टक्केवारी १०० असणे आवश्यक.

विभाग ड – योजनेचा तपशील.

* जास्तीत जास्त तीन व्यक्तीची वारसदार म्हणून नेमणूक करा.

* वर्गणीदाराने योजनेचे नांव, निवृत्तीवेतन निधी व्यवस्थापकाचे नांव आणि योजनेसाठी विभाजनाची टक्केवारी याबाबत माहिती देणे आवश्यक.

वर्गणीदाराची नोंदणी

कायम निवृत्तीवेतन लेखा क्रमांक (PRN no.) प्राप्त करण्यासाठी आहरण व संवितरण अधिकारी (डीडीओ)/जिल्हा अधिकारी कोषागार (डीटीओ) यांना प्रवेश/विनंती अर्ज सादर करणे.

- विनंती अर्जाची तपासणी केल्यानंतर जिल्हा कोषागार अधिकारी सदरचा अर्ज केंद्रीय अभिलेख देखभाल अभिकरण यांचेकडे पाठवतील.
- विनंती अर्जाची स्थिती जाणून घेण्यासाठी केंद्रीय अभिलेख देखभाल अभिकरण पोहोच पावती म्हणून पावती क्रमांक देतील.
- केंद्रीय अभिलेख देखभाल अभिकरण, कायम निवृत्तीवेतन लेखा क्रमांक उत्पन्न करतील.
- केंद्रीय अभिलेख देखभाल अभिकरण, कायम निवृत्तीवेतन लेखा क्रमांक कीट आणि आय – पिन/टी पिन पाठवतील.

वर्गणीदाराची नोंदणी



सूचना — मूळ प्रतीमध्ये अ.क्र.८ आढळून येत नाही.

Shri P A Deshmukh Presentation

आय – पिन आणि टी – पिन ची हाताळणी

➢ <u>तुम्ही आय - पिन खालील बाबी कसा उपयोग करु शकता?</u>

- कोषागार कार्यालयात सादर केलेल्या तपशीलामध्ये बदल करण्याबाबतच्या अर्जाची स्थिती जाणून घेण्यासाठी.
- ऑनलाईनवर तुमच्या व्यवहाराचे विवरणपत्र (एसओटी) पाहण्यासाठी.
- राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेमधील अस्तित्त्वात असलेल्या मध्यस्थाबाबत तक्रार दाखल करण्यासाठी आणि तक्रारीची स्थिती जाणून घेण्यासाठी.

आय – पिन आणि टी – पिन ची हाताळणी

- ➢ <u>तुम्ही तुमचे टी - पिन खालील बाबी करता उपयोग करु शकता.</u>
- कोषागाराचा सादर केलेल्या तपशील मधील बदला बाबतच्या अर्जाची स्थिती जाणून घेण्यासाठी.
- खात्यामधील शिल्लक, मालमत्ता आणि योजनेचा तपशील.
- राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेमधील अस्तित्त्वात असलेल्या मध्यस्थाबाबत तक्रार दाखल करण्यासाठी आणि तक्रारीची स्थिती जाणून घेण्यासाठी.

कायम निवृत्तीवेतन लेखा क्रमांक ओळख पत्राचा नमुना

भारत सरकार

सत्यमेव जयते नवीन निवृत्तीवेतन योजना

नाव
सोमक बॅनर्जी

वडीलाचे नाव
विश्वनाथ बॅनर्जी
जन्म तारीख
१६/०४/१९७८
कायम निवृत्तीवेतन लेखा क्रमांक
११०००१२९३९४५

वर्गणीदारांची सही

फोटो
२३०२२०११

दिनांक ०१.०४.२०१५ पूर्वी राज्य शासनाच्या सेवेमध्ये रुजू झालेले कर्मचारी

- ज्या कर्मचाऱ्याची अंशदायी निवृत्तीवेतन योजनेमध्ये अगोदर नोंदणी केलेली आहे. त्यांना कायम निवृत्तीवेतन लेखा क्रमांक (पीपीएअेन) प्राप्त केलेल्यांनी निवृत्तीवेतन निधी विनियामक व प्राधीकरण यांनी विहित केलेल्या नमुना क्रमांक अेस - I (परिशिष्ट - १) मध्ये आवश्यक असणारी माहिती भरुन तो आहरण व संवितरण अधिकारी यांचेकडे सादर करावा.

दिनांक ०१.०४.२०१५ पूर्वी राज्य शासनाच्या सेवेमध्ये रुजू झालेले कर्मचारी

- आहरण व संवितरण अधिकारी यांनी कर्मचाऱ्यांकडून प्राप्त झालेले अेस - १ नमुने प्राप्त होताच त्वरीत पुढे पाठवावेत.
- जिल्हा कोषागार अधिकारी यांनी त्यांचेकडे प्राप्त झालेले नमुने त्वरीत केंद्रीय अभिलेख देखभाल अभिकरण यांचेकडे पाठवावेत.
- केंद्रीय अभिलेख देखभाल अभिकरण यांनी सदर कार्यालयास कायम निवृत्तीवेतन लेखा क्रमांक (PRN) वाटप करावेत.

दिनांक ०१/०४/२०१५ रोजी किंवा त्यानंतर राज्य शासनाच्या सेवेमध्ये रुजू झालेले कर्मचारी.

- दिनांक ०१/०४/२०१५ रोजी किंवा त्यानंतर रुजू झालेल्या कर्मचाऱ्याबाबतची माहिती आहरण व संवितरण अधिकारी यांनी स्वत: सेवार्थ प्रणालीमध्ये नोंद करावी.
- सदरचा अेस - १ नमुना संबंधीत जिल्हा कोषागार अधिकारी यांना सेवार्थ प्रणालीमध्ये उपलब्ध होईल.
- जिल्हा कोषागार अधिकारी यांनी सेवार्थ प्रणालीमध्ये सदरचा नमुन्यास मान्यता द्यावी.

दिनांक ०१/०४/२०१५ रोजी किंवा त्यानंतर राज्य शासनाच्या सेवेमध्ये रुजू झालेले कर्मचारी.

- एस - १ नमुन्याची कोणतीही छापील प्रत जिल्हा कोषागार अधिकारी यांना पाठविण्यात येऊ नये.
- जिल्हा कोषागार अधिकारी यांनी सदर नमुन्याला मान्यता दिल्यानंतर, अंशदायी निवृत्तीवेतन योजना क्रमांक उदा.कायम निवृत्तीवेतन लेखा क्रमांक सेवार्थ प्रणाली मधून उत्पन्न होईल.
- जिल्हा कोषागार अधिकारी यांनी अशा प्रकारचे एस – १ नमूने केंद्रीय अभिलेख देखभाल अभिकरण यांचेकडे पुढे पाठवावेत.

केंद्रीय अभिलेख देखभाल अभिकरण यांनी कायम निवृत्तीवेतन लेखा क्रमांकाला मंजुरी देणे.

- एस - १ नमुन्यामधील कर्मचाऱ्याची माहिती प्राप्त झाल्यानंतर केंद्रीय अभिलेख देखभाल अभिकरण यांनी संबंधीत कर्मचाऱ्याला कायम निवृत्तीवेतन लेखा क्रमांक वाटप करावा.
- आहरण व संवितरण अधिकारी यांचेमार्फत संबंधीत कर्मचाऱ्यास कायम निवृत्तीवेतन लेखा क्रमांक कीट देण्यात यावे.
- प्रत्येक कर्मचाऱ्याने कायम निवृत्तीवेतन लेखा क्रमांक कीटमधील तपशील तपासून पाहावा, त्यामधील माहितीची अचूकता आणि टी - पिन (दूरध्वनी वैयक्तीक ओळख क्रमांक) आणि आय - पिन (इंटरनेट वैयक्तीक ओळख क्रमांक) प्राप्त झाल्याबाबत खात्री कायम करावी.

केंद्रीय अभिलेख देखभाल अभिकरण यांनी कायम निवृत्तीवेतन लेखा क्रमांकाला मंजुरी देणे.

- जर एखाद्या प्रकरणामध्ये काही अडचण असेल तर, कर्मचाऱ्याने केंद्रीय अभिलेख देखभाल अभिकरण यांचे समवेत थेट संपर्क साधावा.
- जरी पदोन्नती, पदावनती, बदली, परसेवा मधील नेमणुक किंवा इतर कोणत्याही कारणामुळे सदर कर्मचाऱ्याचे दुसऱ्या कार्यालयामध्ये स्थलांतर झाले तरी एकदा वाटप केलेला कायम निवृत्तीवेतन लेखा क्रमांक कधीही बदलत नाही.

राज्य शासनाच्या सेवेमधील कर्मचाऱ्याची पदसेवेमध्ये नेमणूक

- संवर्ग नियंत्रक अधिकारी यांनी अश्या कर्मचाऱ्याचा एस-१ नमुना तयार करुन तो संबंधित जिल्हा कोषागार अधिकारी यांना पाठवावा, ज्यांच्या कार्यक्षेत्रामध्ये संवर्ग नियंत्रक अधिकारी यांचे कार्यालय असेल.
- जिल्हा कोषागार अधिकारी यांनी सदरचा एस-१ नमुन्यामधील अर्ज केंद्रीय अभिलेख अभिकरण यांचेकडे पुढे पाठवावा.
- केंद्रीय अभिलेख देखभाल अभिकरण यांनी सदर कर्मचाऱ्याला कायम निवृत्तीवेतन लेखा क्रमांक वाटप करावा आणि तो संबंधित लेखा नियंत्रक अधिकारी यांना कळवावा.

अखिल भारतीय सेवेमधील परसेवेवर असणाऱ्या अधिकाऱ्याबाबत कार्यपद्धती

- ज्या अधिकाऱ्यांना राज्य अभिलेख प्रतिनिधी यांनी कायम निवृत्तीवेतन लेखा क्रमांक दिलेला आहे. त्यांनी सध्या काहीही करण्याची आवश्यकता नाही.
- परंतु जे अधिकारी दिनांक ०१/०४/२०१५ रोजी किंवा त्यानंतर सेवेमध्ये रुजु झालेले असतील, त्याबाबत संबंधीत कार्यालयाच्या आहरण व संवितरण अधिकारी यांनी सदर अधिकाऱ्याचा सर्व तपशील नमुना अेस – १ मध्ये सेवार्थ प्रणालीमध्ये भरणे आवश्यक आहे.

अखिल भारतीय सेवेमधील परसेवेवर असणाऱ्या अधिकाऱ्याबाबत कार्यपद्धती

- जर केंद्रीय अभिलेख देखभाल अभिकरण यांनी पूर्वीच कायम निवृत्तीवेतन लेखा क्रमांक वाटप केलेला असेल तर त्यांनी केंद्रीय अभिलेख देखभाल अभिकरण यांच्या वेब साईट वरील मार्गदर्शक सूचनानुसार, देण्यात आलेला कायम निवृत्तीवेतन लेखा क्रमांक कार्यान्वित आहे किंवा नाही आणि त्यानुसार आवश्यक ती कार्यवाही करावी.
- परसेवेमधील पदावर, जी परसेवा संस्था राज्य शासनाची स्वत:ची आहे किंवा त्यावर राज्य शासनाचे नियंत्रण आहे. अश्या संस्थेमध्ये दि. ०१/०४/२०१५ रोजी किंवा त्यानंतर रुजु होणाऱ्या आणि ज्यांना कायम निवृत्तीवेतन लेखा क्रमांक प्राप्त झालेला नाही, अश्या परसेवेमधील अखील भारतीय सेवेतील अधिकाऱ्याच्या बाबतीत, संबंधीत सहाय्यक नोडल अधिकारी नियमितपणे सहभाग कपात करणेबाबत तसेच नियोक्त्याचा सहभाग भरणेबाबत जबाबदार असेल.

सहभागाची मासिक कपात

- राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेची कर्मचाऱ्याच्या सहभागाची कपात आणि तेवढाच नियोक्त्याच्या सहभाग मासीक वेतन देयकामधून एकाच वेळी करण्यात यावा.
- कर्मचाऱ्याचा सहभाग आणि नियोक्त्याचा सहभाग आवश्यक म्हणून मासीक पद्धतीने जमा करणे ही आहरण व संवितरण अधिकारी यांची जबाबदारी आहे आणि याबाबत त्यांची खात्री करावी.
- जिल्हा कोषागार अधिकारी यांनी अश्या रक्कमा कोषागारमधून काढण्यात आणि सदर रक्कमा विश्वस्त बँकेकडे पाठवाव्यात.
- सर्व जिल्हा कोषागार अधिकारी आणि अभिलेख आणि लेखा अधिकारी, मुंबई यांना या कारणासाठी आहरण व संवितरण अधिकारी म्हणून नेमण्यात येत आहे.

परसेवेमध्ये असणाऱ्या कर्मचाऱ्या बाबतची कार्यपद्धती

- संबंधीत कर्मचऱ्याच्या मासीक सहभाग संबंधीत संस्था कपात करेल.
- कर्मचाऱ्याच्या सहभाग आणि नियोक्त्याचा सहभाग यांचा घनाविकर्ष (डिमांड ड्राफ्ट) काढून तो संबंधीत जिल्हा कोषागार अधिकारी यांना पाठविण्यात यावा.
- आहरण व संवितरण अधिकाऱ्यांकडून प्राप्त झालेल्या अश्या रक्कमाबाबतचे लेखे ठेवणेसाठी जिल्हा कोषागारिअधिकारी हे जबाबदार असतील.

सहभागाची रक्कम ही विश्वस्त बँकेमध्ये भरणा करण्यात यावी

- राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेसाठी, महाराष्ट्र शासना करिता निवृत्तीवेतन निधी विनियामक व प्राधीकरण यांनी ॲक्सीस बँक यांची विश्वस्त बँक म्हणून नेमणूक केलेली आहे.
- निवृत्तीवेतन निधी विनियामक व प्राधीकरण हे वेळो वेळी विश्वस्त बँक म्हणून घोषीत करतील.
- निवृत्तीवेतन निधी विनियामक व प्राधीकरण हे निवृत्तीवेतन निधी व्यवस्थापक यांची नेमणूक करतील आणि राज्य शासन त्यांचे नाव सुचवतील विश्वस्त बँकेने सदरची रक्कम गुंतवणूक करण्यासाठी निवृत्तीवेतन निधी व्यवस्थापकाकडे हस्तांतरीत करावी.

विश्वस्त बँकेकडे रक्कम हस्तांतर करण्याबाबत जिल्हा कोषागार अधिकारी यांचे कार्य

- कर्मचाऱ्याच्या मासीक वेतन देयकामधून मासीक सहभागाची रक्कम कपात करणे आणि नियोक्त्याच्या सहभागासह वेतन देयकामधून जिल्हा कोषागार अधिकारी यांना पाठविणे ही आहरण व संवितरण अधिकारी यांची जबाबदारी आहे.
- अश्या प्रकारच्या सर्व रक्कमा जिल्हा कोषागार अधिकारी यांनी प्राधान्याने सिंपल रिसीट नमुना - ४५ अ मध्ये कोषागारमधून काढाव्यात.

विश्वस्त बँकेकडे रक्कम हस्तांतर करण्याबाबत जिल्हा कोषागार अधिकारी यांचे कार्य

- या कारणाकरिता जिल्हा कोषागार अधिकारी यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात आलेले आहे.
- वर्गणीदाराच्या सहभागाची धारिका (एसीएफ्)
- वर्गणीदाराच्या सहभागाची धारिका निर्माण केल्यानंतर, जिल्हा कोषागार अधिकारी यांना ट्रंन्झाक्शन आय डी मिळेल.
- दिनांक १ ते १८ पर्यंतची दिनांक २५ पूर्वी आणि दिनांक १२ ते ३०/३१ पर्यंतची पुढील महिन्याच्या दिनांक १० पूर्वी वर्गणीदार सहभागाची धारीका अपलोड करुन केंद्रीय अभिलेख देखभाल अभिकरण यांना पाठविण्यात याव्यात.

विश्वस्त बँकेकडे रक्कम हस्तांतर करण्याबाबत जिल्हा कोषागार अधिकारी यांचे कार्य------पुढे चालू-----

- जिल्हा कोषागार अधिकारी यांनी सहभागाची एकूण रक्कम (कर्मचाऱ्याचा सहभाग आणि नियोक्त्याचा सहभाग) ट्रान्झाक्शन आय.डी.सह बँकेकडे पाठवावी.
- वर्गणीदाराच्या सहभागाची धारिका अपलोड केल्यापासून ५ दिवस पूर्ण होण्या अगोदर हस्तांतराची कार्यपद्धती पूर्ण करण्यात यावी. म्हणजेच १ ते १८ पर्यंतची महिन्याच्या ३० तारखेपूर्वी आणि १९ ते ३०/३१ पर्यंतची पुढील महिन्याच्या १५ तारखेपूर्वी.

विश्वस्त बँकेकडे रक्कम हस्तांतर करण्याबाबत जिल्हा कोषागार अधिकारी यांचे कार्य------पुढे चालू-----

- हा सर्व सहभाग (कर्मचारी आणि नियोक्ता) निवृत्तीवेतन निधी व्यवस्थापकाकडून गुंतवणूक करण्याचा असल्यामुळे आणि त्यांची नेमणूक याच कारणासाठी करण्यात आलेली असल्यामुळे आणि वेळ हे तत्त्व असल्यामुळे सदरची कालमर्यादाचे पालन काटेकोरपणे करण्यात येत असल्याबाबत जिल्हा कोषागार अधिकारी यांनी निरीक्षण करावे.

ताळमेळ

- जिल्हा कोषागार अधिकारी हे विश्वस्त बँकेसोबत होणाऱ्या सर्व व्यवहाराचा प्रत्येक महिन्यास आणि प्रत्येक तिमाहीस ताळमेळ देण्यासाठी जबाबदार असतील.
- आहरण व संवितरण अधिकारी हे कोषागारा समवेत ताळमेळ घेण्यास जबाबदार असतील.

राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेखाली ज्यादा सहभागाची वसुली/कमी सहभागाची वसुलीच्या प्रकरणाबाबत

- कर्मचाऱ्याकडून नियमानुसार १०% (मूळ वेतन + त्यावरील महागाई भत्ता) आणि नियोक्त्याकडून तितकेच १०% सहभाग वसूल करण्यात येत आहे. याबाबत खात्री करण्याची जबाबदारी आहरण व संवितरण अधिकारी यांची आहे.
- ज्या प्रकरणामध्ये कर्मचाऱ्याकडून जास्तीचा सहभाग खात्यामध्ये जमा झालेला असेल. पुढील महिना/ महिन्यामध्ये जास्तीच्या रकमेचे समायोजन करण्यात यावे.

राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेखाली ज्यादा सहभागाची वसुली/कमी सहभागाची वसुलीच्या प्रकरणाबाबत

- दर महिन्याला राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेमध्ये जमा करण्यात आलेला सहभाग तपासणे, आणि त्यामध्ये काही त्रुटी आढळून आल्यास त्याबाबत आहरण व संवितरण अधिकारी यांचेकडे लेखी अहवाल सादर करणे ही कर्मचऱ्याची जबाबदारी आहे.
- जो कर्मचारी याबाबत आवश्यक ती दक्षता घेणार नाही, तो पुढील कामामध्ये प्रस्तुत प्रकरणी न्यायालयामध्ये तक्रार दाखल करु शकणार नाही.

व्यवहाराचे विवरणपत्र (अेस ओ टी)

- व्यवहाराच्या विवरणपत्रामध्ये तुमच्या निवृत्तीवेतन खात्यामध्ये झालेल्या सर्व व्यवहाराच्या तपशीलाचा समावेश असतो.
- तुमच्या नोंदणीकृत पोस्टाच्या पत्त्यावर केंद्रीय अभिलेख देखभाल अभिकरण हे व्यवहाराच्या विवरणपत्राची प्रत दरवर्षी पाठवितात.
- सहभाग रक्कमेची गुंतवणूक केल्याचा तपशील आणि आर्थिक वर्षामध्ये काढून दिलेले भाग, सध्याच्या तारखेस धारण केलेले भाग, तुमच्या कायम निवृत्तीवेतन लेखा क्रमांकाबाबत काही बदल झाला असल्यास त्याबाबतचा तपशील इत्यादि.

व्यवहाराचे विवरणपत्र (अेस ओ टी)

- तुमचे आय - पिन वापरुन केंद्रीय अभिलेख देखभाल अधिकरणाच्या वेबसाईटवर प्रवेश करत तुम्ही व्यवहाराचे विवरणपत्र जाणून घेऊ शकता.

सेवा शुल्क

- केंद्रीय अभिलेख देखभाल अभिकरण आणि राज्य शासन यांचेमध्ये झालेल्या करारनाम्याच्या शर्तीनुसार, दिलेल्या सेवेसाठी केंद्रीय अभिलेख देखभाल अभिकरण सेवा शुल्काची आकारणी करते.
- सेवा शुल्क हे राज्य अभिलेख प्रतिनिधी त्रैमासिक पद्धतीने प्रदान करतात.

ठराव : वर्गणीदाराच्या तक्रारीचे निवारण

- तुम्ही केंद्रीय अभिलेख देखभाल अभिकरण योग्य कॉल सेंटर समवेत टी - पिन चा वापर करुन किंवा केंद्रीय अभिलेख देखभाल अभिकरण यांच्या वेब साईटवर आय - पिन चा वापर करुन तुमच्या तक्रारी/ उदाहरण कळवू शकता.

ठराव : वर्गणीदाराच्या तक्रारीचे निवारण

- नमुना जी - १ भरुन तुम्ही तुमची तक्रार केंद्रीय अभिलेख देखभाल अभिकरण यांचेकडे दाखल करु शकता.
- तक्रार मिळाल्यापासून ३० दिवसाच्या कालावधीमध्ये प्रत्येक तक्रार निकाली काढण्यात यावी.
- तक्रारदारास अंतिम उत्तर देण्यात यावे, त्यामध्ये ठरावाचा तपशील, किंवा तक्रार नाकारत असल्याबाबत योग्य आणि समर्थनीय कारणे लेखी कळविण्यात यावीत.

ठराव : वर्गणीदाराच्या तक्रारीचे निवारण

२. <u>जर तक्रारीत ३० दिवसामध्ये निपटारा करण्यात आला नाहीतर होणारे सांपतीक परीणाम</u>

(अ) निवृत्तीवेतन निधी विनियामक व प्राधीकरण (वर्गणीदाराच्या तक्रारीचे निवारण) ठराव २०१५मधून ठराव क्रमांक २५ मधील तरतूदीनुसार

(ब) निराकरण न झालेल्या तक्रारीबाबत राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना विश्वस्त निधी यांचेकडे पाठपुरावा करावा आणि त्यानंतर निराकरण न झाल्यास वर्गणीदाराने लोकायुक्ताकडे तक्रार दाखल करावी.

ठराव : वर्गणीदाराच्या तक्रारीचे निवारण

२. <u>जर तक्रारीत ३० दिवसामध्ये निपटारा करण्यात आला नाहीतर होणारे सांपतीक परीणाम</u>

(क) अशा परिस्थितीमध्ये प्रकरणाची सोडवणूक विहित कालावधीमध्ये न झाल्यास, लोकायुक्त त्याच्या अधिकारामध्ये मार्गदर्शन करतात किंवा योग्य वाटल्यास रुपये १० लक्ष मर्यादेपर्यंत नुकसान भरपाई आणि व्याज देण्याचा आदेश देतात.

योजनेमधून बाहेर पडणे

वर्ग/प्रकार	ठोक रक्कम % (जास्तीत जास्त अनुज्ञेय)	वार्षिक योजना % (कमीत कमी अनुज्ञेय)	
नियत वयोमान*	६०%	४०%	
मुदतपूर्ती पूर्वी	२०%	८०%	
मृत्यु झाल्यास	१००%	----	

* जर मालमत्ता रु.२ लक्ष पेक्षा कमी असेल तर अशा प्रकरणी १००% रक्कम काढून घेण्यास परवानगी

अेअेसपी

- अेअेसपी - वार्षिक सेवा पुरवठादार
- राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेमधून बाहेर पडताना वर्गणीदाराने दिलेल्या निर्देशानुसार टक्केवारीची ठोक रक्कम वार्षीक योजना खरेदीसाठी वार्षीक योजना पुरवठादार यांना प्रदान करण्यात येते. सदर वार्षीक योजनेमधून संबंधित व्यक्तीस दरमहा रक्कम मिळते.
- राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेमधून बाहेर पडताना वर्गणीदाराने स्वत: निवड केल्यानंतर त्याला वार्षीक सेवा पुरवठादार आणि वार्षीक योजना उपलब्ध करुन देण्यात येते.

वार्षीक सेवा पुरवठादार – विकल्प

१. बजाज असीमाज लाईफ इन्शुरन्स कंपनी लिमीटेड.
२. एच डी एफ सी लाईफ इन्शुरन्स कंपनी लिमीटेड.
३. आय. सी. आय. सी. आय. प्रुडेंशिअल लाईफ इन्शुरन्स कंपनी लिमीटेड.
४. लाईफ इन्शुरन्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया.
५. रिलायन्स लाईफ इन्शुरन्स कंपनी लिमीटेड.
६. एसबीआय लाईफ इन्शुरन्स कंपनी लिमीटेड.
७. स्टार युनियन एम - इची लाईफ इन्शुरन्स कंपनी लिमिटेड.

पैसे काढणे

- सुरवातीपासून १० वर्षेपर्यंत शक्य नाही.
- १० वर्षानंतर, तुमच्या सहभागापैकी फक्त २५%.
- महत्त्वाच्या कारणासाठीच पैसे काढता येतात. उदा.लग्न, शिक्षण इत्यादि.
- १० वर्षे पूर्ण झाल्यानंतर संपूर्ण सेवा कालावधीमध्ये फक्त ३ वेळाच पैसे काढता येतात.

धन्यवाद...